**नीलिमा कुलकर्णी** (रेस्टन, व्हर्जिनीया)



एका 'व्हाईट सुप्रीमीस्ट'चा एक अनुभव आणि त्याच्या अनुषंगाने मी स्वत:चं केलेलं आत्मपरीक्षण इथे आहे. वाचून प्रत्येकाने स्वत:च्या मनात प्रत्येकाने डोकावून बघावं. आणि कधी चुकूनमाकून जेव्हा तमाम मुस्लिमांचा किंवा एखाद्या जातीचाच राग येईल, तेव्हा खालील दिलेलं वोडहाऊसचं वाक्य मनात ठेवावं हा या लेखामागील उद्देश. २००५ चा हा अनुभव.

**रंग माझा वेगळा**

आज सकाळपासून मेरी आणि बेथची गडबड सुरू होती, पेनसिल्वेनियाला एका रिफायनरीत काम करणारी बहुतेक कुटुंबं तिथे जवळच एका डेव्हलपमेंटमध्ये रहात. मेरीचा नवरा बॉब आणि बेथचा नवरा एड दोघंही रिफायनरीत एकाच प्रोजेक्टवर काम करीत होते. अतिशय महत्वाचं, तीन वर्षाचं प्रोजेक्ट सर्वांनी जीव ओतून काम करून अठरा महिन्यात संपवलं होतं. त्याचं बक्षिस म्हणून कंपनीने प्रोजेक्ट्वरच्या वीसेक जणांना त्यांच्या सहचरांसह एका आलिशान रिझोर्टमध्ये विकेंड घालवायला बोलावलं होतं. तिथे उपलब्ध असलेल्या कोणत्याही तीन ॲक्टीविटीज निवडायला मुभा होती. कधी अशा जागी जाण्याचा अनुभव नसलेले हे दोन कुटुंब अक्षरश: भारावले होते. रिझोर्टची माहिती आणून त्यांनी सर्वात महागड्या अशा – गोल्फपासून तर मसाज पर्यंतच्या गोष्टी निवडल्या. फुकट मिळाल्यावर ही संधी कोण सोडणार?

सकाळी गोल्फसाठी एड आणि बॉब पहाटे पाच वाजताच घराबाहेर पडले. आठ वाजता मेरी व बेथ मुलांची बेबिसिटिंगची व्यवस्था करून एकत्र निघाल्या. बेथने सवयीप्रमाणे कारचा रेडिओ लावला. बातमी ऐकून तिच्या अंगावर शहारे आले. तिने लगेच रेडिओ बंद केला.

'ऐकलंस तू? अन्बिलीवेबल! कालच्या इंग्लंडमधल्या कारबॉम्बमध्ये गुंतलेले सगळे मुस्लीम- डॉक्टर होते म्हणे." बेथ

'हो नं! डॉक्टर असो नाहीतर कोणी असो, सगळे मुस्लीम सारखेच.' मेरीने री ओढली.

'बरं तर बरं, आपल्या डेव्हलपमेंटमध्ये असे कोणी उपटसुंभ नाहीयेत.' बेथ

'थॅंक गॉड! ऑईल पीपल आर स्पेअर्ड. या सगळ्या 'ब्राउनिज'ना (काळे, गोरे सोडून इतर सगळे ब्राउनिज) आपल्या देशातून हाकलून दिले पाहिजे.' मेरी म्हणाली. रीफायनरीत काम करणारी मंडळी स्वत:ला 'ऑईल पीपल' म्हणतात.

'आपल्या नवऱ्यांच्या बोलण्यात कधी मुस्लिमांचा उल्लेख आला नाही, म्हणून रिफायनरीतही नसावेत असं वाटतं.' बेथ.

'नशीब, नाहीतर रिफायनरी उडवून दिली असती केव्हाच.' गळ्यातल्या क्रॉसवर हात ठेवत मेरीने मनात प्रार्थना केली.

'जाऊ दे, चांगलं काहीतरी बोलू या' म्हणत तिने विषय बदलला.

भल्या मोठ्या रिझोर्टच्या मैलभर लांब पार्किंग लॉटमध्ये कार ठेवून त्या आत गेल्या. डोळे विस्फारून सगळीकडे बघत होत्या.

'हाय स्टेसी' कंपनीतील इंजिनियर स्टेसी दिसताच मेरीने तिला हाक दिली.
'कालच्या बातमीबद्दल तिच्याशी बोलू नकोस. नाहीतर ती आपल्यालाच उपदेश करेल. सगळे ब्राउनिज तसे नसतात, आपण आपल्या प्रिजुडीसेस दूर ठेवायला पाहिजे वगैरे वगैरे. इंजिनियर ना ती! तिला वाटतं तिचे विचार खूप प्रगल्भ आहेत. खरं म्हणजे मनातून प्रत्येकाला आपल्यासारखंच वाटतं, पण काही उगाचंच 'पोलिटिकली करेक्ट' असण्याचा प्रयत्न करतात.' बेथनं मेरीला ढोसलं .हाय-हेलो झाल्यावर रिसेप्शन डेस्कवरून स्वत:चे बिल्ले घेऊन त्या कॉन्फरन्स रुममध्ये गेल्या. तिथे एका भिंतीशी मोठ्या टेबलावर ब्रेकफास्टसाठी अनेक पदार्थ ठेवले होते. बेगल, कुकीज, डोनटचे बोकाणे भरत असलेल्या एड व बॉबकडे पाहून दोघी हसल्या. पण टेबलाजवळ जाऊन स्वत:ही चापायला सुरवात केली. इतरांशी गप्पा मारत असतांना सहज म्हणून दाराकडे बघणाऱ्या मेरीचा घास घशातच अडकला.
'ओ माय गॉड! हू इज ही?" ती बेथला हळूच म्हणाली. बेथने वळून पाहिलं. साधारण ५-८ उंची, मोठे डोळे, धारदार नाक असा एक 'ब्राउनि' आत येत होता.
'एडी, कम हिअर' बेथने नवऱ्याला हलक्या आवाजात बोलावलं.
'तो कोण आहे?' ती
'कोणता?' एडने नेहमीप्रमाणे मोठ्याने विचारलं. ती चिडली.
'हळू बोलायला काय घेशील? कोणता काय कोणता? कोण तुला इथे वेगळा दिसतोय?' डोळ्यानेच दारातून येणाऱ्या माणसाकडे तिने खूण केली.
'अग तो? तो आमचा मॅनेजर आहे. रॉबी क्वीनकारनी. त्याच्यामुळेच तर आपल्याला हे बक्षीस मिळालं आहे आज ! तुला घाबरायला काय झालं? मी बोललो होतो तुला रॉबीबद्दल.' म्हणत तो रॉबीशी बोलायला गेलासुध्दा.
'क्वीनकारनी म्हणे! रंग पहा आधी स्वत:चा. आयरिश लोकांच्या पासंगाला तरी पुरतोय का? चक्क आयरिश नावं घेऊन आपल्यात मिसळायचं अन् मग दंगेधोपे करायचे.' धक्क्यातून सावरत मेरी म्हणाली.
रॉबीशी ओळख करून द्यायला म्हणून एड, बॉब आपापल्या बायकांना घेऊन आले.
'हाय' मॅनेजरने हात पुढे केला.
'हाय मिस्टर क्वीनकारनी' बेथने बिचकत बिचकत शेक-हंड केला.
'इट्स कुलकर्णी! - रवि कुलकर्णी' समजावून सांगावं तशा सुरात रवीने तिची चूक दुरुस्त केली. जुजबी गप्पा मारून तो इतर लोकात मिसळला.
'त्याची बायको आलेली दिसत नाहीये' तो गेल्यावर मेरी म्हणाली.
'ती कशी येईल? ती बसली असेल घरी बुरखा घेऊन.' बेथ म्हणाली तेव्हा दोघी हसल्या.

खरं म्हणजे रवीची बायको नेहाही त्यांच्यासारखीच सकाळपासून येणार होती. पण अमेरिकेतल्या तमाम भारतीयांप्रमाणे तिचेही विकेंड कार्यक्रमाने खच्चून भरलेले होते. आज मराठी मंडळाचा तिने आयोजित केलेला कार्यक्रम होता. पूर्ण कार्यक्रम नाही पण निदान कार्यक्रम सुरू होईपर्यंत व्यवस्था बघायची, नंतर कोणालातरी सुपूर्त करून निघायचं, रवीच्या बक्षिस समारंभापर्यंत पोहोचायचं असं तिने ठरवलं होतं. ती तयारी करीत होती. भारतातून नुकताच आणलेला नवा पतियाळा स्टाईलचा सूट तिने काढला. नऊवारीसारख्या चुण्या आणि ३ मीटरची ओढणी असणारा तो सुट तिला खूप आवडला. विकेंडसाठी सुटकेस भरून ती घेऊनच ती मराठी मंडळाच्या कार्यक्रमाला गेली. कार्यक्रमाला सुरवात झाल्यावर काम दुसऱ्या कोणाला सुपूर्त करून ती निघाली तेव्हा चार वाजले होते. एक तासाचा ड्राईव्ह, म्हणजे जाईपर्यंत गौरवाचा कार्यक्रम सुरू झाला असणार.

गाडीत नेहमीच्या सवयीने नेहाने रेडीओ लावला. एन. पी. आर. स्टेशनवर पी. जी. वुडहाऊस या नात्झीच्या कॅम्पमधून वाचलेल्या गृहस्थाबद्द्ल सांगत होते. एकदा एका पत्रकाराने त्याला विचारलं, 'Don't you hate Germans?'

तो म्हणाला, 'No. I don't hate anything in plural.'

एका जर्मनांच्या गटाने अत्याचार केले, म्हणून तमाम जातीचा द्वेष करणे चुकीचं आहे. आपल्या सर्वांनाच ते माहीत असतं, पण आचरणात किती लोक आणतात? नेहाने रेडिओ स्टेशन बदललं, अन् ते विचार मागे पडले.

ती रिझोर्टवर पोहोचली. कारच्या ट्रंकमधून सुटकेस काढताना तिच्या हातातली किल्ली खाली पडली. एका हाताने पर्स, ओढणी, सुटकेस सांभाळत तिने किल्ली उचलली, आणि हॉटेलच्या इमारतीकडे चालू लागली. ती थोडं दूर गेली असेल तोच ' यौव! यौव!' असा मागून आवाज आला. काळ्या माणसांच्या पध्दतीची ती हाक ऐकून तिने मागे वळून न पहाता गॉगल्सच्या कोपऱ्यातूनच हळूच मागे पाहिलं. एक काळा तरुण – भडक भगवा शर्ट, अर्धी खाली घसरलेली पँट, गळ्यात घुंगुरमाळा, कमरेला मेखलेसारखी एक जाडी चांदीची चेन, कुरळ्या केसाचं टोपलं असं ते पात्र तिच्याकडेच येत होतं. चोरी, पर्स खेचणे, इथपासून तर खुनापर्यंतच्या सर्व गुन्हयांच्या कथा नेहाच्या डोळ्यापुढून झरकन सरकल्या. ती घाबरली. तिची पावलं भराभर पडू लागली. पर्स आणखीनच घट्ट धरत ती रिसेप्शनच्या डेस्कपर्यंत येऊन पोहोचली. हॉटेलच्या रूमची किल्ली घेऊन एलीवेटरकडे वळली. तोपर्यंत तो हॉटेलच्या दारापर्यंत आला होता.

'यौव!' त्याने पुन्हा आवाज दिला. त्याची तक्रार करावी असं तिच्या मनात आलं, पण नुसती हाक मारण्यापलीकडे त्याने काही केलं नव्हतं, तेव्हा तो विचार तिने बाजूला टाकला. तरीसुध्दा एकटीने पाचव्या मजल्यावरच्या रूमपर्यंत जाणे तिला सुरक्षित वाटेना. तिने विचार बदलला. सामान रिसेप्शनिस्टकडे ठेवून ती कपडे न बदलताच कॉन्फरन्स रुममध्ये गेली. गौरव समारंभ सुरू झाला होता. रवी स्टेजवर होता. कार्यक्रमात व्यत्यय येऊ नये म्हणून, तिच्यासाठी ठेवलेल्या पहिल्या रांगेतील राखीव जागी न बसता ती मागे दाराशीच बसली. भाषणात रवीने तिचा उल्लेख केला तेव्हा सगळ्यांच्या नजरा तिच्याकडे वळल्या. तिच्याकडे किंवा तिच्या कपड्यांकडे पाहून मेरी व बेथची नेत्रपल्लवी झाली.

कार्यक्रम संपल्यावर ती पुढे रविजवळ गेली. नेहाची सर्वांशी ओळख करून देत रवी मेरी, बेथजवळ आला. तेव्हढ्यात त्याचं अभिनंदन करण्यासाठी कंपनींच्या V.P. ने त्याच्या पाठीवर थाप मारली. तो मागे वळला आणि तिकडेच रमला.

मेरी, बेथ आणि नेहा त्याची वाट पहात उभ्या होत्या. एक दोन मिनिट स्तब्धतेत गेली. मेरीने विचारलं, 'डू यु स्पीक इंग्लिश?' एकेक शब्द सुटा करून बोललेले ते वाक्य – पहिल्यांदा अमेरिकेत आलेल्या व्यक्तीला विचारावं तसं! नेहाच्या कपाळाला आठ्या पडल्या.

'What do you mean?' नेहाने विचारलं.

'She…meant… do ... you … understand… English? Our… language?' बेथने खुलासा केला.

नेहा मनात भयंकर चिडली. मनात म्हणाली, 'मूर्खांनो, इंग्लिश नसतं येत तर मी इंग्लिशमध्ये प्रश्न विचारला असता का?' पण तिने स्वत:ला आवरलं. आज रवीचा आनंदाचा दिवस होता. उगाच इथे तमाशा नको. त्याच्या आनंदावर विरजण घालायला नको. प्रश्नाकडे दुर्लक्ष करून ती थोडी बाजूला जाऊन उभी राहिली.

नेहा विचार करत होती. तीस वर्षांपूर्वी आपण जॉर्जियातल्या एका छोट्याशा गावात आलो, त्या लोकांनी भारतीय व्यक्ती कधी पाहिली नव्हती. म्हणून कुतूहलाने ते प्रश्न विचारायचे. त्यात उत्सुकतेचा भाग जास्त होता. आजचा हा प्रश्न तसा नव्हता. उपरोधात्मक, अपमानास्पद होता. पूर्वग्रहदूषित होता. अस्खलित इंग्लिशमध्ये भाषण करणाऱ्या माझ्या नवऱ्याकडे पाहून तरी त्यांनी असा प्रश्न विचारायला नको होता. मी स्वत: मोठ्या कंपनीत मॅनेजर आहे. या भागात शेकडो भारतीय आहेत. मी इंग्लिश बोलत नसेन असं यांना का वाटलं? माझ्या कपड्यांवरून? की माझ्या रंगावरून? की तीस वर्ष या देशात काढूनही आपण इथे उपऱ्याच आहोत? तिला सुरेश भटांची एक कविता आठवली.

रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा
गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा.

तिचे मोकळे पाय मणामणाचे ओझे लादल्यासारखे जड झाले होते. कातडीच्या रंगापलीकडे पहायला हे जग कधी

शिकणार? या बायकांनी माझी ओळख करून घ्यायचीही तसदी घेतली नाही. सप्टेंबर ११ नंतरचा हा बदल आहे. इतक्या वर्षात असा प्रसंग आला नव्हता. अपमान गिळत रवीची वाट पहात ती बाजूला उभी राहिली.
'हा ….य !यु मस्ट बि मिसेस कुलकर्णी…!  आयेम स्टेसी' एकीने स्वत:ची ओळख करून दिली.
'हाय स्टेसी, नाईस मीटिंग यु',  उसनं हसू तोंडावर आणत नेहा झालेल्या आघातातून सावरायचा प्रयत्न करीत होती.
स्टेसी रवीच्या कामाचं कौतुक करीत होती.
'ही एज अ जेम ऑफ अ परसन !  वी ऑल लव हिम' …ती
नेहा अजूनही हरवल्यासारखी उभी होती.
'अग, तुझं काही हरवलं आहे का?' स्टेसी
'नाहीतर!' मनातले भाव लपवत नेहा म्हणाली. पण मनात म्हणत होती,
'हो!  खूप हरवल्यासारखं वाटतंय. माझी ओळख! माझं अस्तित्व  ! या मातीत रुजण्याचे माझे तीस वर्षांचे प्रयत्न!.'
'पुन्हा एकदा विचार कर.' स्टेसी खेळकरपणे म्हणाली.
उगाच चाचपडायचं म्हणून तिने पर्स चाचपडली.
'Oh my God!  माझा फोन !' नेहा म्हणाली.
स्टेसी हसली, 'बाहेर एक सदगृहस्थ उभा होता. त्याने माझा बिल्ला पाहिला आणि म्हणाला, 'एक सुंदर कपडे घातलेल्या बाई तुमच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये गेल्या आहेत. त्यांना हा फोन द्याल का?' म्हणत स्टेसीने तिचा फोन पुढे केला.
नेहाच्या लक्षात आलं – कारची किल्ली उचलताना तिचा फोन पडला असावा. आणि ते पात्र? तेव्हढ्यासाठीच तिला हाका मारीत होतं.
'कसा होता तो गृहस्थ?'
'तरुण, भगवा शर्ट…' स्टेसी म्हणाली. त्याच्या रंगाचा उल्लेख तिने टाळला होता.
म्हणजे तोच.  त्याच्या 'वरलीया रंगा' वरून नेहाने दूषित पूर्वग्रह बांधला होता. तिला स्वत:ची लाज वाटली. म्हणजे त्या बायकांपेक्षा मी वेगळी नाही. मीही रंगाने आंधळी झालेली…  पुन्हा सुरेश भट…
'चालणारा पांगळा अन् पाहणारा आंधळा…'
त्या गृहस्थांचे आभार मानण्यासाठी नेहा बाहेर आली. पण कुठलीच अपेक्षा न करता तो केव्हाच निघून गेला होता.

**पूर्वप्रकाशित : रंगदीप – २०१०**

***